सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्याबाबत.
मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या.,सावरगांव, ता.परखेड, जि. नागपूर.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रकल्प-१२१५/प्र.क्र.७३/टेक्स (अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३० जानेवारी, २०१६.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः सुतगि १२००/प्र.क्र.१५३/ टेक्स-१, दिनांक १३.६.२०००.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः सुतगि ११२०००/प्र.क्र.१२५/ टेक्स-१(अ), दिनांक २.८.२००३.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः सुतगि ११०६/५५३१/ प्र.क्र.११६/टेक्स-१(अ), दिनांक ३१.८.२००७.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः सुतगि ११०८/प्र.क्र.९१/ टेक्स-१(अ), दिनांक ३०.६.२०११.
५) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांकः कार्या ६(१)/ सुतगि/६६९२/२०१५, दिनांक १९.६.२०१५.
६) शासन पत्र, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांकः प्रकल्प-१२१५/प्र.क्र.७३/ टेक्स-१(अ), दिनांक ४.१.२०१६.

प्रस्तावना :-

मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर या सूतगिरणीची दहाव्या पंचवार्षिक योजना काळात अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे. शासनाने दिनांक ३०.०६.२०११ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या सुधारीत प्रकल्प अहवालाची किंमत रु.६१७४.२४ लाख इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार या सूतगिरणीने महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई यांचेकडून २५२०० चात्यांचा सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करुन संचालक वस्त्रोद्योग यांचे मार्फत शासनाच्या मंजूरीसाठी सादर केलेला आहे. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ५ अन्वये सदर प्रकल्प अहवाल सुकाणू समितीच्या मंजूरीसाठी सादर केलेला आहे. सुकाणू समितीच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत सदर सूत गिरणीच्या प्रकल्प अहवालात दर्शविलेल्या किंमतीबाबत चर्चा करुन दहाव्या पंचवार्षिक योजनेत अर्थसहाय्यासाठी घेण्यात आलेल्या मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर या सूत गिरणीच्या प्रकल्प अहवालाची एकूण रुपये ५७५२.९३ लाख किंमत समितीने मान्य केली. ही किंमत शासनाने दि.३०.६.२०११ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या मॉडेल प्रकल्प अहवालातील किंमतीच्या मर्यादेत असल्याने, मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., सावरगांव,

ता. नरखेड, जि. नागपूर या सूत गिरणीच्या रुपये ५७५२.९३ लाख एवढया प्रकल्प किंमतीस मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., सावरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर या सूतगिरणीने आतापर्यंत झालेल्या ७०% बांधकामावर रु.१७२६.८१ लाख इतका खर्च केला आहे. वस्त्रोद्योग संचालकांनी प्रोरेटा पध्दतीने २५२०० चात्यांच्या बांधकामासाठी रु.९२५.२७ लाख प्रस्तावित केले आहे. या बाबीचा विचार करुन आतापर्यंत बांधकामावर झालेला जास्तीचा खर्च (रु.१७२६.८१ - रु. ९२५.२७) = रु. ८०१.५४ लाख व पुढील उर्वरीत ३० % बांधकामासाठी येणारा खर्च गिरणी स्वनिधी उभारुन करेल. या अटीवर २५२०० चात्यांच्या रु.५७५२.९३ लाख इतक्या प्रकल्प किंमतीस मान्यता देत आहे. सदर किंमतीपेक्षा अधिकचा खर्च लागल्यास सदर अतिरिक्त खर्चाची रक्कम सूतगिरणीने स्वभाग भांडवल जमा करुन करावी व ती प्रकल्पावर खर्च करावी या अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

२. शासनाच्या विद्यमान धोरणानुसार प्रकल्पाचा वित्तीय आकृतिबंध १:१ या प्रमाणात भाग भांडवल व कर्ज असा राहील. सूत गिरणीचे सभासद भाग भांडवल व शासकीय भाग भांडवल यांचे प्रमाण १:९ असे राहील. त्यानुसार सूतगिरणीने पुढीलप्रमाणे निधीची उपलब्धता करावयाची आहे :-

(रुपये लाखात)

अ)	सभासद भाग भांडवल (५ %)	रु. २८७.६५
ब)	शासकीय भागभांडवल (४५ %)	रु.२५८८.८२
क)	दीर्घ मुदती कर्ज (५० %)	रु.२८७६.४६
	एकूण	**रु.५७५२.९३**

सदर सूतगिरणीचा प्रकल्प किंमतीचा बाबनिहाय तरतूदीचा तपशिल खालीलप्रमाणे राहील व त्यामर्यादेत गिरणीने खर्च करणे गिरणीस बंधनकारक राहील.

(रुपये लाखात)

अ.क्र.	तपशिल	प्रकल्पाची सुधारीत प्रकल्प किंमत
१	जमीन व जमीन सुधारणा	५८.०६
२	फॅक्टरी इमारत व इतर बांधकाम	९२५.२७
३	प्लँट ॲण्ड मशिनरी	३१०२.७८
४	इतर कायम मालमत्ता	७२८.००
५	स्टोअर्स व स्पेअर्स	६१.००
६	प्रिऑपरेटिव्ह खर्च	२०८.१६

अ.क्र.	तपशिल	प्रकल्पाची सुधारीत प्रकल्प किंमत
७	मार्जीन मनी	४१०.१७
८	कॉन्टीजन्सी	२५९.४९
	एकूण	**५७५२.९३**

३. सूतगिरणीने रु.५७५२.९३ लाख इतक्या किंमतीमध्ये प्रकल्पाची उभारणी पूर्ण करावी. शासनाकडून देय भागभांडवलाची रक्कम निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मंजूर प्रकल्प किंमतीपेक्षा जास्त रक्कम लागल्यास सदरची जास्तीची रक्कम सूत गिरणीने स्वबळावर उभी करणे आवश्यक राहील. शासन या जास्तीच्या रकमेस मान्यता देणार नाही. तसेच अतिरिक्त होणारा खर्च सूत गिरणीला स्वत: करावा लागेल. दि.१५/६/२००६ अन्वये स्थापन केलेल्या संबंधीत सनियंत्रण समित्यांची मान्यता घ्यावी. गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०११६४१५५५४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anilkumar R Ugale

Digitally signed by Anilkumar R Ugale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d265dc74c98f72f41f5a1403db16525e09e7de2e336c366de3a32ea2a050a8a, cn=Anilkumar R Ugale
Date: 2016.02.01 16:41:54 +05'30'

(अनिलकुमार रा. उगले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अ. मु. स.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२) अ. मु. स.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
३) अ.मु. स.(वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई ३२,
४) प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
७) आयुक्त, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) जिल्हाधिकारी, नागपूर,
९) प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, नागपूर,
१०) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर,

११) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नागपूर,
१२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., मुंबई ०१,
१३) कार्यासन अधिकारी, १६ सी, १७ सी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
१४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रतीत),
१५) अध्यक्ष, मातोश्री मागासवर्गीय शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या.,सावरगांव, ता.नरखेड, जि. नागपूर.
१६) निवड नस्ती (टेक्स १ (अ)/(ब)).